# कागदपत्र तपासणीकरीता उमेदवारांना सुचना.

१) दिनांक ०४/११/२०२५ च्या जाहिरातीनुसार कंत्राटी स्टाफनर्स पदाकरीता अर्ज केलेल्या उमेदवारांपैकी सोबत जोडलेल्या यादीतील सर्व १५८ उमेवारांपैकी अनु क्रमांक १ ते ७९ वरील उमेदवारांनी दिनांक 10/02 /२०२६ रोजी व अनु क्रमांक ८० ते १५८ वरील उमेदवारांनी दिनांक 11/02/२०२६ रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा यांचे कार्यालयामध्ये सकाळी ठिक १०:३० वाजता उपस्थित रहावे. इतर उमेदवारांनी उपस्थित राहु नये.

२) इतर पदे, Psychologist, Dental Surgeon, Dental Hygienist, Programme manager Public Health, District Programme Manager (AYUSH) यांची अंतरिम निवड व प्रतिक्षा यादी लावण्यात आलेली आहे, त्या सर्व उमेदवारांनी त्यांचे मुळ कागदपत्र तपासणीकरीता दिनांक 12 / 02 /2026 रोजी सकाळी ठिक १०:३० वाजता उपस्थित रहावे.

३) कागदपत्र तपाणीकरीता उमेदवारांने स्व खर्चाने उपस्थित रहायचे आहे, या करीता कार्यालयाकडुन कोणताही प्रवास भत्ता किंवा दैनिक भत्ता दिला जानार नाही.

४) कागपत्र तपासणीकरीता उमेदवाराने दिलेल्या दिवशी उपस्थित राहणे आवश्यक आहे, उमेदवार गैरहजर राहिलेल्यास पुढील उमेदवारास संधी देण्यात येईल. गैरहजर उमेदवारस कोणत्याही सबबीखाली इतर दिवशी संधी देण्यात येणार नाही, गैरहजर उमेदवारांचा पुढील प्रक्रियेसाठी विचार केला जानार नाही.

५) सादर केलेल्या कागपत्राची/प्रमाणपत्राची सत्यता सिध्द करणे हि संपुर्ण जबाबदारी उमेदवाराची/अर्जदाराची असते. कागपत्रामध्ये त्रृटी आढळल्यास, कागदपत्र चुकिचे/खोटे/बनावट असल्याचे निदर्शनास आल्यास/अढळल्यास सदरील उमेदवारास नियुक्ती देण्यात येणार नाही तसेच संबंधीतावर फसवनुकीचा गुन्हा दाखल करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

६) कागपत्र तपासणीकरीता उमेदवाराने खालील प्रमाणे सर्व मुळ कागपत्र सोबत आणने आवश्यक आहे. मुळ कागपत्र नसल्यास त्याबाबत समितीचा निर्णय अंतिम राहिल.

| अ.क्र. | विवरण |
|---|---|
| १ | शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र/आधार कार्ड/जन्माचा दाखला. |
| २ | अर्जासोबत जोडण्यात आलेल्या शैक्षणीक अर्हतेच्या सर्व गुणपत्रीका |
| ३ | अनुभव प्रमाणपत्र<br>• जाहिरातील अटी व शर्ती मधील अट क्रमांक ८ नुसार नियुक्ती प्राधिकारी यांच्या स्वाक्षरीचेच अनुभव प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल. (उदा. नियुक्ती आदेशावर जर जिल्हा आरोग्य अधिकारी किंवा जिल्हा शल्य चिकित्सक यांची स्वाक्षरी असेल तर अनुभव प्रमाणपत्रसुध्दा जिल्हा आरोग्य अधिकारी किंवा जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या स्वाक्षरीचेच असावे, इतर अधिकारी यांच्या स्वाक्षरीचे अनुभव प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.) |

| | |
|---|---|
| | • जाहिरातीमधील अट क्रमांक ६ नुसार अनुभव हा शासकिय/निमशासकिय/स्थानिक स्वराज्य संस्था व NHM यांचाच ग्राह्य धरण्यात येईल, बाह्यस्त्रोत यंत्रणेचा/खाजगी किंवा इतर कोणताही अनुभव ग्राह्य धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.<br>• अनुभव प्रमाणपत्राची सत्यता पडताळण्यासाठी खालील कागपत्र आवश्यक आहे<br>१. ज्या कालावधीतील अनुभव जोडलेला आहे, त्या कालावधीतील सर्व कार्यालयीन नियुक्ती/पुनर्नियुक्ती आदेश.<br>२. आवश्यकता पडल्यास कार्यालय संबंधीताचे अनुभव कालावधीतील बँकेत वेतन जमा झाल्याबाबतचा पुरावा म्हणुन ज्या खात्यात वेतन जामा झाले आहे त्या बँक खात्याचे अनुभव कालावधीतील बँक स्टेटमेंट मागवु शकते याची नोंद घ्यावी. |
| ५ | महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल (Maharashtra Nursing Council) नोंदणी प्रमाणपत्र |
| ६ | जातिचे प्रमाणपत्र. |
| ७ | लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र. |
| ८ | इतर आवश्यक अर्जासोबत जोडलेले सर्व कागदपत्र |

सदस्य सचिव,
जि.ए.आ. व कु.क. समिती
तथा जिल्हा अरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, बुलडाणा

30/01/26

## दैनिक लोकमत व दैनिक देशोन्नती मध्ये दिनांक ०४/११/२५ रोजी प्रसिध्द जाहिरातीनुसार कंत्राटी पध्दतीने डेंटल हायजीनिस्ट पदाकरीता अंतरिम निवड व प्रतिक्षा यादी

| अ.क्र | अर्ज क्रमांक | उमेदवाराचे नाव | जन्म तारीख | जातीचा प्रवर्ग | उमेदवाराचे वय वर्ष,महिणे, दिवस | पदवि शाखा | पदविच्या अंतिम वर्षाची टककेवारी | उमेदवार पदविच्या टककेवारीचे ५० टक्के | अधिक शैक्षणिक अर्हता | अधिक शैक्षणिक अर्हतेच्या अंतिम वर्षाची टककेवारी | अधिक शैक्षणिक अर्हतेचे टककेवारीचे २० टक्के | शासकिय संस्था/स्थानीक स्वराज्य संस्थेमध्ये एकुण अनुभव वर्ष | अनुभवाचे गुण | एकुण गुण (रकाणा ०९+१२+१४) | पात्र/ अपात्र | निवड/प्रतिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 1 | 1 | मिलींद पांडुरंग टेकाडे | 21-Dec-79 | Open | 45 Y,10 M,28 D | Yes | 56.17 | 28.09 | B.SC | 62.22 | 12.44 | 8 | 30 | 70.53 | पात्र | निवड |
| 2 | 3 | सुजन वेलजी गावित | 2-Aug-00 | Open | 25 Y,3 M,16 D | Yes | 58.67 | 29.34 | 0 | 0.00 | 0 | 0 | 0 | 29.34 | पात्र | प्रतिक्षा |

सदस्य,
निवड समिती तथा
जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक,
राष्ट्रीय आरोग्य अभियान, बुलडाणा

सदस्य,
निवड समिती तथा
माता व बाल संगोपन अधिकारी,
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद,
बुलडाणा

सदस्य
निवड समिती व जि.ए.आ. व कु.क. समिती तथा
जिल्हा शल्य चिकित्सक,
जिल्हा सामान्य रुग्णालय, बुलडाणा

सदस्य सचिव,
निवड समिती व जि.ए.आ. व कु.क. समिती तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, बुलडाणा

अध्यक्ष
निवड समिती व जि.ए.आ. व कु.क. समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, बुलडाणा